# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## प्रवेश सुचना

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला अंतर्गत खालील शिक्षण संस्था मार्फत एस.एस.सी. (१०वी) परिक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांकडून कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रमासाठी वर्ष २०२४ – २०२५ करीता प्रवेशासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या **http://www.pdkv.ac.in** या संकेतस्थळांवर आणि संबधीत ग्रामीण शिक्षण संस्थेत विक्रीस उपलब्ध असलेल्या माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. कृषि विज्ञान पदविका धारक या विद्यापीठातील तसेच इतर विद्यापीठातील काही पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रथम वर्षास प्रवेश घेण्यास पात्र ठरतात.

**अ) अभ्यासक्रम – व्दिवर्षीय कृषि विज्ञान पदविका**

| **शिक्षण संस्था** | **अर्जदाराची पात्रता** |
|---|---|
| १. ग्रामीण शिक्षण संस्था (कृषि विज्ञान शाखा) अमरावती. | **अमरावती राजस्व विभागातील रहिवाश्यांसाठी**<br>**(यवतमाळ, अमरावती, वाशीम, अकोला व बुलढाणा जिल्हे)** |
| २. ग्रामीण शिक्षण संस्था (कृषि विज्ञान शाखा) पिपरी वर्धा. | **नागपूर राजस्व विभागातील रहिवाश्यांसाठी**<br>**(नागपूर, भंडारा, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे)** |

वरील अभ्यासक्रमासाठी विहीत अर्ज व माहीतीपत्रक **दि. १०/०६/२०२४** पासून आपआपल्या राजस्व विभागातील ग्रामीण शिक्षण संस्थांमधून किंवा विद्यापीठाच्या http://www.pdkv.ac.in या संकेतस्थळांवरुन डाऊनलोड करुन सादर करता येतो. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रू. ५००/– तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रू. २५०/– प्रवेश अर्ज शुल्क आहे.

सदरचे शुल्क आर.टी.जी.एस. (RTGS) ने सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा-- डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला येथिल **खाते क.** 10428433117, IFSC Code- SBIN0002171 या खात्यावर आर.टी.जी.एस.ने पाठवून प्रवेश शुल्क भरल्याची पावती प्रवेश अर्जासोबत जोडावी. संपूर्ण भरलेला अर्ज संबंधीत कागदपत्रासह **दि. ०१/०७/२०२४** पर्यंत सादर करावा. उशिरा सादर केलेल्या/प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला